नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | Year - 4rd | अंक - १४४ | Issue - 144 | वार - सोमवार दि. १९ ऑक्टोबर २०२६ | Blow- Monday Date 19 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## टायगर श्रॉफवरील हल्ल्याची लॉरेन्स बिश्नोई गँगने स्वीकारली जबाबदारी; ऑडिओ क्लीप, फेसबुक पोस्ट जारी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ यांच्यावरील गोळीबारानंतर काही वेळातच धमकीची ऑडिओ क्लीप व्हायरल करण्यात आली आहे. त्यामध्ये, लॉरेन्स बिश्नोई गँगने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली असून अनिल पंडित आणि हरमन संधू यांनी गोळीबाराची जबाबदारी स्वीकारत असल्याचे ऑडिओ क्लीपमध्ये ऐकू येत आहे. दरम्यान, या ऑडिओ क्लीपची पुष्टी एबीपी माझा करत नाही, पण हे ऑडिओ व्हायरल करण्यात आले आहेत. तर, ऑडिओनंतर धमकीची फेसबुक पोस्ट देखील शेअर करण्यात आलीय.

मुंबईतील जुहू पोलीस स्टेशन समोरच अभिनेता टायगर श्रॉफवर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. पोलीस स्टेशनच्या समोर असलेली गल्लीमध्ये सहा ते सात राउंड गोळीबार झाला. मिळालेल्या माहितीनुसार टायगर श्रॉफला गोळी लागली नाही. टायगर सुखरुप असल्याची माहिती मिळत आहे, हल्लयानंतर टायगरने स्वतः गाडी चालून दोघांना रुग्णालयात नेले आहे. आरोपी हे बाईकवर आले होते. गोळीबार करुन ते फरार झाले आहेत. लॉरेन्स बिश्नोई गँगने या हल्लयाची जबाबदारी स्वीकारली आहे. हरमन संधू आणि अनिल पंडित यांनी या हल्लयाची जबाबदारी घेतली असून आमचा भाऊ लॉरें बिश्नोईचं न ऐकल्यास आणि सलमान खानसोबत काम केल्यास असंच भोगावं लागेल, अशा शब्दात बॉलिवूड कलाकारांना धमकी देण्यात आलीय.

जय महाकाल, जय श्रीराम.. आम्ही फोन करुन टायगर श्रॉफला समजावलं होतं, पण त्याला समजलं नाही. त्यामुळे, आज चांगल्या पद्धतीने त्याला समजून आलं असेल. तसेच, मुंबई सिनेसृष्टीत जो कोणी आमचं ऐकणार नाही किंवा सलमान खानसोबत काम करेल, त्याचा पुढचा नंबर असेल, अशा शब्दात लॉरेन्स बिश्नोई गँगने फेसबुक पोस्टवरुन धमकी दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आरोपींनी सहा ते सात राउंड गोळीबार केला आहे. दरम्यान, या घटनेनंतर पोलीस लगेच घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिसांनी परिसरात नाकाबंदी लावून आरोपीचा शोध सुरु केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना फोन करुन गोळीबाराच्या घटनेची माहिती घेतली. तसेच, तत्काळ घटनेचा वेगाने तपास करुन दोषींवर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी पोलिस आयुक्तांना दिले आहेत. दरम्यान, मुंबईचे ऊझ्झ मोहित गर्ग यांनी या हल्लयाबाबत माहिती दिली आहे. पोलिसांनी या घटनेमध्ये १५ टीम बनवल्या आहेत. टायगर श्रॉफ खासगी कामासाठी आले होते, काम करुन जात असताना त्यांच्या कारवर गोळीबार झाल्याचे गर्ग यांनी सांगितले.

विशेष म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना फोन करुन अभिनेते टायगर श्रॉफ यांच्यावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेची माहिती घेतली. तसेच, पोलिस आयुक्तांना तत्काळ वेगाने तपास करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही फडणवीसांनी दिले आहेत.

# राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी

### २० ते २५ ऑक्टोबरदरम्यान परतीचा पाऊस; ४० ते ५० किमी राहणार वाऱ्याचा वेग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील काही भागांमध्ये वातावरणात बदल झाला आहे. अनेक ठिकाणी वादळी पावसाने हजेरी लावली आहे. राज्यभरातील नागरीक गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झाले आहेत. त्यामुळे अचानक पावसाचे आगमन होत असल्याने नागरिकांना दिलासा मिळणार आहे. हवामान विभागाकडून अनेक जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही जिल्ह्यांमध्ये वादळी वारे देखील वाहण्याची शक्यता आहे. काही जिल्ह्यांमध्ये वाऱ्याचा वेग हा ताशी ४० ते ५० किती इतका राहण्याची शक्यता आहे. तर काही जिल्ह्यांमध्ये ३० ते ४० किमी प्रतितास राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाकडून १९ ऑक्टोबरसाठी १२ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. यावेळी वाऱ्याचा वेग हा ताशी ४० ते ५० किमी इतका



राहण्याची शक्यता आहे.

पुणे जिल्हा आणि पुणे घाट परिसरातही १९ ऑक्टोबरला वादळी पावसाची शक्यता आहे. इथे देखील वाऱ्याचा वेग हा प्रतितास ४० ते ५० किमी इतका राहण्याची शक्यता आहे. याशिवाय कोल्हापूर जिल्हा, कोल्हापूर घाट परिसर, सातारा जिल्ह्या, सातारा घाट परिसर, सांगली, बीड, लातूर या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यावेळी वाऱ्याच वेग हा ताशी ३० ते ४० किमी प्रतितास राहण्याची शक्यता आहे. तर धाराशिव जिल्ह्यात ४० ते ५० किमी प्रतितास वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडून १९ ऑक्टोबरसाठी विदर्भातील गडचिरोली आणि नागपूर जिल्ह्यासाठीदेखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

हवामान विभागाकडून २० ऑक्टोबरसाठी राज्यातील तीन जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवली आहे. कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, नागपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दिवशी इतर ठिकाणी वातावरण कोरडे राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, १९ ऑक्टोबरला अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे.

हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनीदेखील राज्यातील पावसाबाबत महत्त्वाचा अंदाज वर्तवला आहे. राज्यात २० ते २५ ऑक्टोबर या काळात परतीचा पाऊस येणार आहे. हाच पाऊस रब्बीच्या पेरणीचा निवाडा करणार आहे.

## टायगर श्रॉफच्या कारवर गोळीबार, दुचाकीवरुन आलेल्या तिघांनी झाडल्या गोळ्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईमध्ये जुहू पोलीस स्टेशनच्या अवघ्या १०० मीटर अंतरावरती बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर गोळीबार झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमध्ये टायगर श्रॉफ बचावला असला तरी त्याचा ड्रायव्हर मात्र गंभीर जखमी असल्याची माहिती समोर आली आहे. तब्बल सात राऊंड फायर केल्यानंतर दुचाकीवरून आरोपी फरार झाले.समोर आलेल्या माहितीनुसार जुहू पोलीस स्टेशनच्या १०० मीटर अंतरावरती हा गोळीबार झाला. या गोळीबारानंतर आता रस्ता बंद करण्यात आला आहे. डीसीपी मोहित गर्ग यांनी घटनास्थल धाव घेतली. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी गोळीबार झाला तिथून ३०० मीटर अंतरावरती रोहित शेट्टी यांच्याच घरावरती गोळीबार झाला होता. दरम्यान, टायगर श्रॉफच्या गाडीवर हल्ला झाल्यानंतर बिश्नोई गँगने या गोळीबाराची जबाबदारी घेतली आहे. या संदर्भातील एक ऑडिओ व्हायरल झाला असून या संदर्भात जर सलमान खानसोबत काम केल्यास तर प्रत्येकाचे हाल असाच होईल अशी धमकी सुद्धा दिली आहे.



गोळीबारानंतर झिशान सिद्धीकी यांनी सांगितले की, आम्हाला दोन वर्षांत अजून न्याय मिळालेला नाही. माझ्या वडिलांच्या निधनाला दोन वर्षे झाली आहेत आणि मुंबईतील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती ज्या प्रकारे बिघडत आहे, ते खूप दुर्दैवी आहे. मला नुकतेच कळले की टायगर श्रॉफवर गोळीबार झाला, आणि ही एक अत्यंत चुकीची गोष्ट आहे.

पूर्वी, जेव्हा माझा जन्मही झाला नव्हता, तेव्हा आम्ही मुंबई किती असुरक्षित होत आहे याबद्दल ऐकायचो. मी माझ्या सुरक्षेची मागणी करत आहे, पण माझी सुरक्षा एक टक्काही वाढलेली नाही. त्यामुळे, ही एक मोठी चिंतेची बाब आहे. मला वाटते की मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांनी या प्रकरणाकडे लक्ष दिले पाहिजे आणि आपण पोलीस अधिकारी व गुप्तचर यंत्रणेची निश्चितपणे चौकशी केली पाहिजे, कारण मुंबईत असे घडत आहे हे खूप दुर्दैवी आहे.

सुप्रिया ताई सुळे म्हणाल्या की, हे धक्कादायक आहे, सातत्याने महाराष्ट्रात क्राईम वाढतोय. म्हणजे हा आरोप नाहीये, हे वास्तव आहे. केंद्र सरकारचा डेटा जो सांगतो, हे डबल इंजिन सरकार आहे. म्हणजे एकाच विचाराचं सरकार महाराष्ट्रात आहे आणि एकाच त्याच विचाराचं केंद्रात आहे. त्या केंद्र सरकारचा डेटा सांगतो की महाराष्ट्रात क्राईम वाढलेला आहे. म्हणजे अतिशय चिंताजनक आहे. माझी महाराष्ट्राच्या सरकारला विनंती आहे की एकीकडे प्रचंड दुष्काळ महाराष्ट्रात आहे, आत्महत्या वाढतायत, बेरोजगारी खूप मोठी आव्हानं राज्याच्या आणि देशाच्या समोर आहेत. कुठेतरी लॉ अँड ऑर्डरचा प्रश्न हा वाढत चाललाय आणि लॉ अँड ऑर्डरचे प्रश्न कधी वाढतात? क्राईम कधी वाढतो? जेव्हा इकॉनॉमिक सिच्युएशन, आर्थिक इशूज जेव्हा वाढतात, तेव्हा या गोष्टी होतात. हे अतिशय चिंताजनक आहे आणि महाराष्ट्र सरकार या विषयाबद्दल गांभीर्याने नाही, हे महाराष्ट्राचं दुर्दैव आहे.

## कोलकात्यात दुर्गापूजा मंडपात चेंगराचेंगरी; १९ जणांचा मृत्यू

कोलकत्ता : पश्चिम बंगालमधील उत्तर कोलकाता येथील चोरबागान सार्वजनिक दुर्गापूजा मंडपात शनिवारी रात्री चेंगराचेंगरीची घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत १९ जणांचा मृत्यू झाला असून २५ जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री जोरदार पाऊस सुरू असताना दुर्गापूजा मंडपात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. पावसापासून बचाव करण्यासाठी भाविकांची धावपळ सुरू झाली. त्यातच मंडपात प्रवेश करण्यासाठी गर्दी वाढल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आणि चेंगराचेंगरी झाली, असे सांगितले जात आहे.

या दुर्घटनेतील जखमींना तातडीने कोलकाता मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे काही जणांना मृत घोषित करण्यात आले, तर उपचारादरम्यान काहींचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. जखमींवर उपचार सुरू असून एका व्यक्तीची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे.

या घटनेनंतर राज्य सरकारकडून मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आल्याचे वृत्त आहे. मृतांच्या वारसांना प्रत्येकी २५ लाख रुपये आणि कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी देण्याबाबतही घोषणा झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमींच्या उपचारांचा खर्च सरकारकडून केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

या चेंगराचेंगरीच्या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. गर्दी नियंत्रणासाठी केलेली व्यवस्था, मंडपातील प्रवेश आणि बाहेर पडण्याचे मार्ग तसेच आपत्कालीन सेवांची उपलब्धता यांची तपासणी होण्याची शक्यता आहे. आयोजक आणि सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित व्यक्तींची पोलिसांकडून चौकशी सुरू असल्याचे वृत्त आहे.

या दुर्घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आल्याचे वृत्त आहे. इतर राजकीय नेत्यांनीही या घटनेबद्दल शोक व्यक्त करत पीडित कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत.

या दुर्घटनेमुळे सार्वजनिक उत्सवांमध्ये गर्दीचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था आणि आपत्कालीन मदत यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

### ३९ जण गंभीर जखमी

### मृतांमध्ये महिला आणि लहान मुलांचा देखील समावेश; अपघातामुळे परिसरात संतापाची उसळली लाट

# ग्वाल्हेरमध्ये अनियंत्रित ट्रकने भाविकांना चिरडले; पंधरा जणांचा दुर्दैवी अंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ग्वाल्हेर : मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथील शीतला माता मंदिराजवळ भीषण अपघाताची घटना घडली आहे. रविवारी (१८ ऑक्टोबर), रात्री उशिरा धानाने भरलेला एक ट्रक पोलिसांचा बॅरिकेड तोडून उतारावरून घसरला आणि रस्त्यावरील भाविकांना अक्षरशः चिरडत गेला. यात १५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झालाय, तर ३३ जण जखमी झाल्याची माहिती आहे. मृतांमध्ये महिला आणि लहान मुलांचा देखील समावेश होता. या अपघातामुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. तर या अपघातानंतर पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, हा ट्रक रस्त्यावर थांबवण्यात आला होता, परंतु तो बॅरिकेड्स तोडून पुढे गेला. त्यानंतर चालकाचे नियंत्रण सुटल्याने तो उतारावरून वेगाने खाली आला आणि मंदिराच्या बाहेरील भिंतीवर व प्रवेशद्वारावर जाऊन आदळला. या अपघातात रस्त्यावरून चाललेले भाविक वाहनाखाली चिरडले गेले.

ग्वाल्हेरचे एसएसपी धर्मवीर सिंग म्हणाले, ही एक अत्यंत दुःखद घटना आहे. मोठ्या संख्येने भाविक शीतला माता मंदिराकडे जात होते. छिनोरहून येणाऱ्या रस्त्याला तीव्र उतार आहे, जिथे अवजड वाहनांच्या वाहतुकीस मनाई आहे. ते पुढे म्हणाले, पहाटे सुमारे दीड वाजता, धानाने भरलेला एक ट्रक तिथे थांबवण्यात आला. ट्रकने पोलिसांचा बॅरिकेड तोडून तो वेगाने पुढे गेला. त्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. ट्रक उतारावरून खाली घसरला आणि मंदिराच्या बाहेरील भिंतीला व प्रवेशद्वाराला धडकला. रस्त्यावरील भाविक ट्रकखाली चिरडले गेल्याने हा अपघात झाला. घटनास्थळी कर्तव्यावर असलेले दोन पोलीस कर्मचारीही जखमी झाले. एसएसपी पुढे म्हणाले, पाच ते सहा रुग्णांची प्रकृती फ्रॅक्चरमुळे गंभीर असून, बाकीच्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. सर्व जखमींवर रुग्णालयात





उपचार सुरू आहेत.

अपघातामुळे प्रभावित झालेल्या एका स्थानिक महिलेने सांगितले, जेव्हा मी तिथे गेले, तेव्हा त्यांनी मला माझ्या मुलाला पाहूही दिले नाही. तो ठीक आहे आणि त्याच्यावर उपचार सुरू आहेत, असे ते म्हणाले. मला थांबायला सांगितले. सकाळी, त्यांनी मला घरी सोडले आणि पुन्हा तेच सांगितले. मग मला फोन आला की त्याचा मृत्यू झाला आहे. त्यांनी मला त्याचा चेहराही दाखवला नाही. माझा मुलगा १७-१८ वर्षांचा होता. त्याने काहीही खाल्ले नव्हते, आणि ते त्याला इथे घेऊन आले. मला दोन मुली आहेत, आणि आता माझे कोणीच नाही. पोलीस प्रशासनाने आम्हाला खोटी माहिती दिली.

अपघातात आपला मुलगा दिव्यांशला गमावलेल्या त्याच्या आईने अश्रूंनी आपले दुःख व्यक्त केले. त्या म्हणाल्या, माझी सून आणि माझे मोठे व लहान मुलगे तिथे होते. मला सकाळी ६ वाजता अपघाताची माहिती मिळाली. दिव्यांशच्या आईने सांगितले की, त्यांची मुलगी कुटुंबातील सदस्यांना शोधायला गेली होती, पण पोलिसांनी तिला तसे करू दिले नाही. तिने पोलिसांना प्रश्न विचारला, माझ्या मुलीला त्यांचा शोध का घेऊ दिला नाही? पोलीस मला मदत का करत नाहीत? मला सांगा, जर हे तुमचे स्वतःचे मूल असते, तर तुम्हाला त्रास झाला नसता का? दिव्यांशच्या आईने पुढे सांगितले की, जर कोणी हरवले तर त्यांना शोधणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. तिचा आरोप आहे की, पोलिसांनी तिला तिचे कुटुंब शोधण्यात मदत केली नाही किंवा तिच्या मुलीलाही त्यांचा शोध घेऊ दिला नाही. या घटनेमुळे कुटुंब अत्यंत दुःखी आणि संतप्त झाले आहे.

## संपादकीय....

### तात्पुरती सुटका

गेल्या अनेक महिन्यांपासून भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांमध्ये व्यापार करारासंबंधित चर्चा सुरू आहे. दोन्हीही देशांना हा करार पुढे न्यायचा आहे, परंतु या करारात काही अडचणी आहेत. या अडचणींमुळे हा करार अंतिम होण्यास वेळ जात आहे. अशात अमेरिकेने रशियन तेल खरेदीवर लादलेल्या निर्बंधांमुळे भारताला १००% टॅरिफचे मोठे धोके होते. पण आता हे निर्बंध तात्पुरते रद्द करण्यात आले आहे. १००% टॅरिफ म्हणजे अमेरिकी खरेदीदारांना एखाद्या आयात केलेल्या वस्तूची खरेदी करण्यासाठी त्या वस्तूच्या किंमतीच्या दुप्पट पैसे मोजावे लागतील. अशात ती वस्तु अमेरिकेच्या बाजारपेठेत अतिशय महाग किंमतीत उपलब्ध झाल्याने त्याच्या मागणीत फार घट होईल आणि संबंधित देशाला अमेरिकेच्या बाजारपेठेत व्यापार वाढवणे फारच कठीण जाईल. अमेरिकेच्या रशिया तेल खरेदीवरील निर्बंधामुळे भारतीय तेल कंपन्यांचे नियोजन दबावाखाली होते. अशात या निर्बंधांतुन तात्पुरती सुटका मिळाल्यामुळे भारतीय तेल कंपन्यांकडे रशियासारख्या प्रमुख तेल पुरवठादाराचा पर्याय उपलब्ध राहतो. दुसरी गोष्ट म्हणजे जर अमेरिकेने भारतावर १००% टॅरिफ लादले असते तर अमेरिकी बाजारपेठेत भारतातून निर्यात झालेल्या वस्तु जवळपास दुप्पट किंमतीत मिळाल्या असत्या. त्यामुळे भारतीय वस्तूंसाठी अमेरिकेत स्पर्धात्मक वातावरण तयार झाले असते. या निर्णयामुळे भारत-व्यापार करार एक टप्पा आणखीन पुढे जाण्याची शक्यता आहे.

# पडघ्यात नवरात्रोत्सवानिमित्त दांडिया आणि गरब्याचा ठेका रंगला!

## विविध मंडळांच्या आयोजनाला नवतरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; पारंपरिक गरब्याने उत्सवात भरली रंगत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून भिवंडी तालुक्यातील पडघे परिसरात गरबा आणि दांडियाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. संगीताचा ठेका, पारंपरिक वेशभूषा आणि गरब्याच्या तालावर फेर धरून नृत्य करणाऱ्या तरुणाईमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळांच्या वतीने गरबा आणि दांडिया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, नवतरुणांसह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळत आहे.

ओम श्री साईनाथ सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ, पडघे यांच्या वतीने आयोजित दांडिया कार्यक्रमाला तरुणाईचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. मंडळाने जपलेली ही ३० वर्षांची परंपरा परिसरातील सांस्कृतिक उत्सवाचे आकर्षण ठरत आहे.



संगीताच्या तालावर दांडिया खेळणाऱ्या तरुणाईमुळे कार्यक्रमात चांगलीच रंगत निर्माण झाली आहे. नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरा जपण्यासोबतच सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक वारसा वृद्धिंगत होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दरम्यान, महाजनवाडी हॉल येथे गुजराती नवरात्री उत्सव मंडळ, पडघा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गरबा उत्सवातही मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या ठिकाणी गुजराती संस्कृतीची परंपरा जपत दोन टाळी, तीन टाळी, दांडिया गरबा तसेच पारंपरिक गरब्याचे विविध प्रकार खेळले जात आहेत. पारंपरिक पद्धतीने फेर धरून गरबा खेळण्याच्या या उपक्रमामुळे उत्सवाला विशेष रंगत आली आहे. संगीताच्या तालावर एकसुरात आणि उत्साहाने गरबा खेळणाऱ्या सहभागींचे वातावरण लक्षवेधी ठरत आहे.

याशिवाय, सुदर्शन मित्र मंडळ, पडघे; नवदुर्गा मित्र मंडळ, पंचशीलनगर; शिवछत्रपती मित्र मंडळ, दीनदयाळ नगर, पडघे; तसेच आई तुळजा भवानी मित्र मंडळ, न्यू बालाजी नगर पडघा,

बालाजीनगर येथील मंडळांच्या वतीनेही दांडिया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे पडघे परिसरातील विविध भागांत नवरात्रोत्सवाची धूम पाहायला मिळत आहे.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने एकत्र येणारी तरुणाई, पारंपरिक नृत्यप्रकारांचे जतन आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे पडघे परिसरातील नवरात्रोत्सवाला विशेष रंगत आली आहे. विविध मंडळांच्या या सांस्कृतिक उपक्रमांमुळे परिसरात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले आहे.

# शिक्षक परिषदेच्या पाठिंब्यामुळे डॉ. रोंगे सरांच्या विजयाची समीकरणे सोपी!

**शिक्षक परिषदेचे संघटनात्मक जाळे डॉ. रोंगे सरांच्या मदतीला!**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे- 'महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद ही राज्यव्यापी शिक्षकांसाठी लढणारी संघटना आहे. शिक्षण क्षेत्रातील समस्यांसाठी लढणारी ही संघटना राष्ट्रहितासाठी कार्य करते. प्रत्येक जिल्ह्यामध्ये तसेच पुणे विभागाचा विचार केला तर ५८ तालुक्यात ही परिषद पोहोचली आहे. 'जिथे शिक्षक तिथे शिक्षक परिषद' आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने आत्तापर्यंत महाराष्ट्रात सतरा उमेदवार अर्थात सतरा आमदार निवडून दिलेले आहेत आणि शिक्षण परिषदेने निवडून दिलेले सर्व आमदार हे चारित्र्य संपन्न आहेत आणि समाजाची जाण असणारे प्राध्यापक, प्राचार्य, आयआयटीयन पासून ग्रामीण भागातील उमेदवार शिक्षक परिषदेने दिले आहेत. शून्यातून विश्व निर्माण करणारे उमेदवार शिक्षक परिषदेने आजपर्यंत दिलेले आहेत. चारित्र्य संपन्न उमेदवार म्हणून परिषदेने डॉ. रोंगे सरांची निवड केली आहे. पाठीमागील इतिहास पाहता यंदा डॉ. बी. पी. रोंगे सरांचा विजय निश्चित आहे म्हणून डॉ. रोंगे सरांना आम्ही पाठिंबा देत आहोत.' असे प्रतिपादन राज्य शिक्षक परिषदेचे विभागीय अध्यक्ष सुरेश राठोड यांनी केले.

पुण्यात श्रमिक पत्रकार संघाच्या कार्यालयात आयोजिलेल्या पत्रकार परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे पुणे विभाग प्रमुख सुरेश राठोड माहिती देत होते. यावेळी सोबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे महानगरचे कार्यवाह विष्णू मोरे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे पिंपरी चिंचवडचे प्रमुख अरुण देवकते आणि शिक्षण परिषदेचे जेष्ठ सदस्य शिवाजीराव भोसले आदी उपस्थित होते. यावेळी पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे उमेदवार डॉ. बी. पी. रोंगे सर म्हणाले की,'मी जवळपास मागील दीड वर्षापासून म्हणजे ज्यावेळी पुणे विभाग शिक्षक निवडणूक जवळ आल्याची चाहूल लागली तेंव्हापासून कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे आणि सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांत असलेल्या शाळा, महाविद्यालयांमधील शिक्षकांशी प्रत्यक्ष भेटीगाठीच्या माध्यमातून संवाद साधत आलोय. त्यानंतर कोणतेही शिक्षक, प्राध्यापक हे रजिस्ट्रेशन (नोंदणी)पासून दूर राहिला नाही पाहिजे यासाठी आमच्या यंत्रणेने रजिस्ट्रेशनच्या शेवटच्या दिवसापर्यंत मेहनत घेतली. त्यातून हजारो शिक्षकांचे रजिस्ट्रेशन केले आहे. शिक्षक, प्राचार्य, मुख्याध्यापक, संस्थापक आणि पदाधिकारी यांच्याशी संवाद साधण्याचा योग आला. या सर्वांमधून शिक्षकांच्या अपेक्षा वाढल्या आणि मला शिक्षकांच्या समस्या समजल्या. सर्वांतून एकच सांगतो की प्रामाणिक प्रयत्न केल्यास, प्रचंड जिद्द असेल तर कितीही अवघड काम पुर्णत्वाला जाऊ शकते. यासाठी मी निवडणूक लढवण्याचे ठरवले. त्या अनुषंगाने सर्व शिक्षकांच्या प्रेमाने आणि त्यांच्या पाठिंब्याने मी विजयी होणार असून त्यांच्या समस्या सोडवण्याची ग्वाही देतो.' असे सांगून त्यांनी आपले दीर्घ विचार प्रकट केले. पुढे बोलताना सुरेश राठोड म्हणाले की, 'शिक्षक परिषदेने पाचही जिल्ह्यांत जाऊन चाचपणी केली असून सासवडला यासाठी मोठा निर्धार मेळावा भरवला होता. एकूणच पक्ष विरहित कार्य असताना शिक्षक परिषदेच्या पाठबळावर ताकत वाढवत आहोत. परिषदेच्या वतीने केलेल्या नोंदणीतील वैचारिक धारा संपन्न असणारे १५ हजार मतदार आहेत व डॉ. रोंगे सरांना वैयक्तिक ओळखणारे २२ हजार मतदार आहेत म्हणजे एकूणच याच ठिकाणी डॉ. रोंगे सरांचा विजय निश्चित आहे.' असे सांगून त्यांनी परिषदेच्या कार्याचा लेखाजोखा मांडला. 'पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने होणार्या मतदानासाठी आता काही दिवस शिल्लक राहिले असून या निवडणुकीत अत्यंत नाट्यमय घटनाक्रम पाहण्यात येत आहेत. पुणे विभागात १५ हजार शिक्षक संलग्न असलेल्या 'महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने' आणि शिक्षक संघटनातील धुरिणांनी आणि परिवाराने प्रा. डॉ. बी. पी. रोंगे सर यांना जाहीर पाठींबा दिल्याने डॉ. रोंगे सरांच्या विजयाचा मार्ग अधिक सुकर आणि प्रशस्त होताना दिसत आहे. स्वच्छ चारित्र्य, स्वेरीसारखं उभं केलेलं विकासात्मक मॉडेल, चाळीस वर्षे शिक्षणक्षेत्रात जपलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या अॅकॅडेमीक कौन्सिल, मॅनेजमेंट कौन्सिल, सिनेट या स्तरावर घेतलेल्या विविध जबाबदाऱ्या यामुळे प्रा. डॉ. बी. पी. रोंगे सर यांनी निवडणुकीमध्ये शिक्षक ते शिक्षक आघाडी घेतल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. डॉ. रोंगे सर यांच्या विजयासाठी अनेक हितचिंतक, माजी विद्यार्थी संघटना आणि सर्व परिवार झटून कामाला लागल्याने जबरदस्त अंडर करंट असल्याचे दिसून येत आहे. राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार प्रा. डॉ. बी. पी. रोंगे सरांच्या उमेदवारी अर्जावर घेतलेली हरकत, तरीही तो अर्ज कायम ठेवण्यात त्यांना आलेले यश आणि आता महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद आणि वेगवेगळ्या संघटनांनी दिलेला मजबूत पाठिंबा आणि आतून काम करण्याचा दिलेला शब्द यामुळे डॉ. रोंगे सरांच्या विजयाचा मार्ग प्रशस्त झाला आहे. परिवाराचे पाठबळ, शिक्षक परिषदेची १५ हजार शिक्षकांची संघटनात्मक ताकद तसेच डॉ. रोंगे सरांचा २२ हजार शिक्षकांशी थेट संपर्क यामुळे प्रा. डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे सर यांच्या विजयाची समीकरणे सोपी झाली असल्याचे राजकीय निरीक्षक सांगतात. एकूणच यंदाची ही शिक्षकांची निवडणूक डॉ. रोंगे सरांच्या पारड्यात विजयाची माळ टाकणार, हे स्पष्ट झाले आहे.

# कवळी येथे विश्व वारकरी मंडळाचा पाचवा वर्धापन दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील कवळी येथे विश्व वारकरी मंडळाचा पाचवा वर्धापन दिन साजरा करण्यात आला यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे पूजन व श्री हनुमंत रायाची पूजन करण्यात आले.

कवळी येथे विश्व वारकरी मंडळ ग्राम शाखा श्रीनाथ महाराज सेवा धारी भजनी मंडळ या ग्राम शाखेच्या फलकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कवळी येथे श्री विठ्ठल रुक्मिणी व माऊली ज्ञानेश्वर महाराज जगद्गुरु तुकाराम महाराज संत शिरोमणी मारुती महाराज कानेगावकर यांच्या मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचं प्रास्ताविक व सूत्रसंचालन नेताजी लहू जगताप यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा गावच्या लोकप्रिय सरपंच राहीबाई लहू जगताप या होत्या तर उद्घाटक म्हणून नाथ संस्थान देवताळा चे महंत श्री राजेंद्र गिरी महाराज व विश्व वारकरी मंडळाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश अध्यक्ष ह भ प कुमार पाटील होते.

प्रमुख पाहुणे विश्व वारकरी मंडळाचे औसा तालुका अध्यक्ष ह भ प. शिवाजीराव बागल.सह अध्यक्ष ह भ प सुधीर महाराज होळीकर. तालुका उपाध्यक्ष तुकाराम महाराज बिराजदार.बाळकृष्ण महाराज जाधव..तालुका महिला अध्यक्ष माधुरीताई पाटील.तालुका उपाध्यक्ष शकुंतलाताई सावंत.. शहराध्यक्ष ह भ प सरोजिनीताई कटारे.तालुका सचिव मारुती दादा सगर. सहसचिव गोविंदराव ससाणे. संपर्कप्रमुख व्यंकटरावजी माने.

औसा शहर सहअध्यक्ष महानंदाताई मिटकरी कोषाध्यक्ष भारत ताई. उपाध्यक्ष श्यामा ताई शिंदे शहर उपाध्यक्ष नरसिंग जाधव. संपर्कप्रमुख लक्ष्मण शिंदे तालुका कोषाध्यक्ष धनराज कांबळे.किसनरावजी पाटील. विष्णू बुवा. दत्तगीर महाराज कुमठा. गुणवंतराव लांडगे. लक्ष्मीबाई वाकसे इंदुमतीताई जोडवे. अनुराधाताई बाबळसुरे.

कार्यक्रमाचे आयोजक व तालुका कार्यकारणी सदस्य उमेश जगताप. औसा शहर सचिव वसंतरावजी सर्जे. शहर सदस्य बाबू स्वामी.सुमनताई मुळे. बालिकाताई शिंदे. कमलताई सूर्यवंशी.छायाताई कुलकर्णी.मंगलताई कदम. अनुसयाताई सूर्यवंशी. तालुका कार्यकारणी व शहर कार्यकारिणीच्या सन्माननीय सदस्य पदाधिकाऱ्यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला..

यावेळी वर्धापन दिन निमित्त माऊली सन्मान पुरस्कार देऊन औसा. निलंगा. धाराशिव.लातूर जिल्हा विविध क्षेत्रांमध्ये धार्मिक सामाजिक आरोग्य पत्रकारिता संस्कृती अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या बारा मान्यवर पती-पत्नी जोडप्यांचा माऊली पुरस्कार सन्मानपत्र श्रीमद भगवत गीता ग्रंथ व मानपत्र देऊन गौरवण्यात आले यावेळी मान्यवरांचे मार्गदर्शन भाषण झाली ग्रामीण भागातून जवळपास ५५ गावच्या भजनी मंडळाने व औसा शहरातील २१ ग्राम शाखेने भजन स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदवला यावेळी औसा तालुक्यातून व औसा शहरातून अनेक भजनी मंडळांनी आपली उपस्थिती.

कवळी सह पंचक्रोशीतील अनेक प्रतिष्ठित नागरिक भाविक भक्त माता माऊली ग्रामस्थ यांनी अतिशय उत्तम प्रतिसाद यावेळी दिला.

# कल्याण-कसारा तिसऱ्या मार्गिकेच्या १४ कि.मी. पहिल्या टप्प्याचे (कसारा ते खर्डी) लोकार्पण मुख्य सुरक्षा आयुक्तांच्या हस्ते संपन्न; कसारा मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा

**आज कल्याण-कसारा रेल्वे मार्गावरील प्रवाशांसाठी ऐतिहासिक दिवस ठरला आहे.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विजय शंकर घनघाव/कल्याण-कसारा : तिसऱ्या मार्गिकेच्या पहिल्या टप्प्याचे म्हणजेच कसारा ते खर्डी (१४ कि.मी.) या मार्गिकेचे लोकार्पण आज खर्डी येथे मुख्य सुरक्षा आयुक्त (उेाळीीळेपशी ेष ठरळश्रुरू डरषशीूं) श्री. गुरु प्रकाश यांच्या हस्ते विधिवत पूजा करून नंतर तिसऱ्या मार्गिकेची जोडणी करुन करण्यात आले.

यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ऊठच्) श्री. हिरेश मीना,*मुख्य अभियंता (उहळशष एपसळपशशी) श्री.






रिजवान अहमद, उप मुख्य अभियंता श्री. नजीम मुल्ला,

- वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक (डी. ऊजच्) श्री बी. अरुण कुमार,

वरिष्ठ अभियंता श्री. सचिन पांचाळ*विद्युत विभागाचे मुख्य अभियंता*आणि *कल्याण-कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्री. राजेश घनघाव*यांच्यासह उपसरपंच श्री. मोकाशी आणि अधिकारी, कर्मचारी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन २०११ च्या रेल्वेच्या अर्थ संकल्पात कल्याण कसारा आणि कल्याण कर्जत तिसरी मार्गिकेची घोषणा करण्यात आली होती, मात्र सदरचा प्रकल्प २४ जुलै २०१६ रोजी मध्ये रेल्वेचे तत्कालीन डिव्हिजनल रेल्वे युजर्स कन्सल्टेटिव कमिटीचे सदस्य तथा कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचचे अध्यक्ष श्री राजेश घनघाव यांचे हस्ते विधिवत पूजा करुन सदरच्या तिसऱ्या मार्गिकेच्या कामाला सुरुवात झाली, तब्बल दहा वर्षानंतर दिनांक १७/१०/२०२६ रोजी सदरचा मार्ग सुरू झाला आहे.गेल्या अनेक वर्षांपासून कल्याण-कसारा-कर्जत रेल्वे प्रवासी संघटना तिसऱ्या मार्गिकेसाठी सातत्याने पाठपुरावा करत होती. आज पहिला १४ कि.मी. चा टप्पा पूर्ण झाल्याने कसारा घाटातील वाहतूक कोंडी आणि बंचिंगच्या समस्येवर मोठा तोडगा निघणार असून, लोकल सेवांना वेळेत धावण्यास मदत होणार आहे.

या तिसऱ्या मार्गिकेचा दुसरा टप्पा खर्डी ते आसनगाव हा मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होणार असल्याचे एका रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले आहे, तर पुढील तिसरा टप्पा हा आसनगाव ते कल्याण हा डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचा उद्देश आहे.

या ऐतिहासिक कामाबद्दल प्रवासी संघटनेतर्फे रेल्वे प्रशासनाचे आणि विशेषतः उठड श्री. गुरु प्रकाश व ऊठच् श्री. हिरेश मीना तसेच मुख्य अभियंता श्री रिजवान अहमद यांचे तसेच ग्रे इन्फ्रा कंपनीचे प्रमुख श्री.चंद्रेशभाई पटेल,आकाश पटेल, आणि प्रीतेश घनघाव यांनी चांगल्या पद्धतीने १४ की मी चे काम वेळेत पूर्ण केल्याबद्दल आभार मानण्यात आले. उर्वरित खर्डी ते कल्याण हा टप्पा देखील लवकरात लवकर पूर्ण करावा, अशी मागणी संघटनेतर्फे यावेळी करण्यात आली.

**राजेश घनघाव**
**अध्यक्ष, कल्याण-कसारा-कर्जत रेल्वे प्रवासी संघटना**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२



# सोलापूर डीसीसी बँक निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टींचा दबदबा कायम!

## सोसायट्यांविरोधातील ३४ हरकती फेटाळल्या; सिद्धाराम म्हेत्रे यांना मोठा धक्का..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (डीसीसी बँक) आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्रातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. प्रारूप मतदार यादीवर दाखल करण्यात आलेल्या हरकतींच्या सुनावणीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या समर्थक सोसायट्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यांच्या सोसायट्यांविरोधात दाखल करण्यात आलेल्या सर्वच्या सर्व ३४ हरकती विभागीय सहनिबंधकांनी फेटाळून लावल्याने अक्कलकोट तालुक्यातील राजकीय वर्तुळात या निर्णयाची चर्चा सुरू झाली आहे.

हा निर्णय शिवसेनेचे नेते सिद्धाराम म्हेत्रे यांच्यासाठी मोठा राजकीय धक्का मानला जात असून, आगामी डीसीसी बँक निवडणुकीच्या दृष्टीने आमदार कल्याणशेट्टी यांच्या गटाला महत्त्वाचे बळ मिळाल्याचे चित्र आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या निवडणुकीत सहकारी संस्थांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याने प्रारूप मतदार यादी, संस्थांची वर्गवारी आणि मतदारांच्या पात्रतेसंदर्भातील बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. याच पार्श्वभूमीवर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर विविध सोसायट्यांच्या नोंदी आणि पात्रतेबाबत हरकती दाखल करण्यात आल्या होत्या. या हरकतींवर पुण्याचे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी दिग्विजय आहेर यांच्या कार्यालयात सलग चार दिवस सविस्तर सुनावणी पार पडली.

**३४ हरकती फेटाळल्याने कल्याणशेट्टी गटाला दिलासा**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या समर्थक सोसायट्यांविरोधात प्रारूप मतदार यादीवर एकूण ३४ हरकती दाखल करण्यात आल्या होत्या. या हरकतींच्या अनुषंगाने चार दिवस सुनावणी घेण्यात आली. संबंधित बाजूंचे म्हणणे आणि कायदेशीर बाबी विचारात घेतल्यानंतर विभागीय सहनिबंधक दिग्विजय आहेर यांनी सर्व ३४ हरकती फेटाळून लावल्या.

या निर्णयामुळे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या समर्थक सोसायट्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आगामी निवडणुकीच्या दृष्टीने मतदार यादीसंदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांवर निर्णय झाल्याने त्यांच्या गटासाठी ही घडामोड महत्त्वपूर्ण ठरली आहे.

डीसीसी बँकेच्या निवडणुकीत सहकारी संस्थांच्या माध्यमातून आपले राजकीय वर्चस्व सिद्ध करण्यासाठी विविध गटांकडून प्रयत्न केले जात आहेत. अशा परिस्थितीत कल्याणशेट्टी यांच्या समर्थक सोसायट्यांविरोधातील सर्व हरकती फेटाळल्या जाणे, ही त्यांच्या गटाच्या दृष्टीने दिलासादायक बाब मानली जात आहे. त्यामुळे अक्कलकोट तालुक्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणांची चर्चा पुन्हा एकदा रंगू लागली आहे.

**इतर २३ सोसायट्यांच्या वर्गवारीबाबतच्या हरकती मान्य**

या सुनावणीमध्ये केवळ ३४ हरकतींचाच विषय नव्हता, तर इतर सहकारी संस्थांच्या वर्गवारीसंदर्भातील हरकतींवरही निर्णय घेण्यात आला. एकूण २३ सोसायट्यांनी वर्गवारीबाबत हरकती दाखल केल्या होत्या. या हरकती विभागीय सहनिबंधकांनी मान्य केल्या असून, संबंधित सोसायट्यांचे वर्गीकरण नियमानुसार करण्यात आले आहे.

त्यामुळे प्रारूप मतदार यादीतील संस्थांच्या वर्गवारीबाबत उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांचाही निपटारा झाला आहे. निवडणूक प्रक्रियेत सहकारी संस्थांची वर्गवारी महत्त्वाची असल्याने या निर्णयाकडेही सहकार क्षेत्रातील जाणकारांचे लक्ष लागले होते.

**मतदार यादीतील नावांच्या दुरुस्तीला हिरवा कंदील**

दरम्यान, मतदार यादीतील नावांमध्ये दुरुस्ती करण्याच्या मागणीसाठी दाखल करण्यात आलेल्या अन्य १४ हरकतीही सुनावणीदरम्यान मान्य करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मतदार यादीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात येणार आहेत.

या निर्णयामुळे प्रारूप मतदार यादीतील त्रुटी दूर करून निवडणूक प्रक्रिया अधिक अचूक करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. एका बाजूला आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या समर्थक सोसायट्यांविरोधातील सर्व ३४ हरकती फेटाळण्यात आल्या, तर दुसऱ्या बाजूला वर्गवारी आणि मतदारांच्या नावांबाबतच्या हरकती मान्य करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सुनावणीतील विविध निर्णयांमुळे आगामी निवडणुकीची तयारी अधिक महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचली आहे.

ॲड. उमेश मराठे, ॲड. समर्थ दरेकर यांच्याकडून बाजू मांडणी

या संपूर्ण हरकत व सुनावणी प्रक्रियेदरम्यान संबंधित सोसायट्यांच्या वतीने ड. उमेश मराठे आणि ॲड. समर्थ दरेकर यांनी बाजू मांडली. त्यांनी सुनावणीमध्ये संबंधित संस्थांची बाजू मांडत कायदेशीर कामकाज पाहिले. चार दिवस चाललेल्या या प्रक्रियेत दाखल हरकतींचा विचार करून संबंधित प्राधिकरणाने निर्णय घेतला.

**डीसीसी बँकेच्या निवडणुकीकडे जिल्ह्याचे लक्ष**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीत कोणत्या गटाचे वर्चस्व राहणार, याबाबत जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे.

सहकार क्षेत्रातील संस्थांचे प्रतिनिधित्व, मतदारांची पात्रता आणि मतदार यादीतील नोंदी या निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणार आहेत.

या पार्श्वभूमीवर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या समर्थक सोसायट्यांविरोधातील ३४ हरकती फेटाळल्या जाणे ही महत्त्वाची घडामोड मानली जात आहे. या निर्णयामुळे कल्याणशेट्टी गटाला दिलासा मिळाला असून, अक्कलकोट तालुक्यातील सहकार क्षेत्रात त्यांच्या राजकीय प्रभावाबाबत चर्चा सुरू झाली आहे.

दुसरीकडे, शिवसेनेचे नेते सिद्धाराम म्हेत्रे यांच्यासाठी हा निर्णय राजकीयदृष्ट्या अडचणीचा मानला जात आहे. मात्र, अंतिम मतदार यादी, निवडणुकीतील उमेदवारांची भूमिका आणि विविध गटांची पुढील रणनीती यावर आगामी निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

एकूणच, डीसीसी बँकेच्या निवडणुकीपूर्वी झालेल्या हरकतींच्या सुनावणीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या समर्थक सोसायट्यांना मिळालेला दिलासा हा अक्कलकोटच्या सहकार क्षेत्रातील महत्त्वाचा राजकीय टप्पा ठरला आहे. आता आगामी निवडणुकीत या घडामोडींचे पडसाद कसे उमटतात आणि सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणे कोणते वळण घेतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



# स्थानिक गुन्हे शाखा ,सोलापूर ग्रामीण यांची धडाकेबाज कामगिरी, गांजा विक्री करणारा आरोपी अटकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आरोपी त्यांच्याकडून १७ किलो ९९४ ग्रॅम वजनाचा गांजा व शिफ्ट कार एकूण १५ लाख ७९ हजार ७००/रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत.

केंद्र शासनाच्या नशा मुक्त भारत मोहिमे अंतर्गत आमली पदार्थ विरोधी विशेष मोहीम राबवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे त्यानुसार मा पोलीस अधीक्षक यांनी या आठवड्यामध्ये अमली पदार्थ विरोधी मोहीम राबवणीवर लक्ष केंद्रित केली आहे. शाखेची पोलीस निरीक्षक यांना सूचना दिले आहेत.

सजय सूचनाप्रमाणे पोलिस निरीक्षक संजय जगताप यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस पथक यांना कारवाई करण्याबाबत आदेशही केली होती. स्थानिक गुन्हे शाखेतील विजय शिंदे यांच्या पथकातील पोलीस कॉन्स्टेबल/५८० मनोज राठोड यांना गोपनीय माहिती मिळाली की, कामती पोलीस ठाण्याच्या हद्दीतून सोलापूर ते मिरज जाणारी महामार्गावर इचगाव टोल नाक्या जवळ इसम नामे शुभम लालासाहेब काळे, हा त्याच्याकडील शिफ्ट कार क्रमांक एम एच दहा डी क्यू ८८ ९७ मधून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ गांजा सोबत घेऊन येत आहे सदरची माहिती सदरची माहिती यांनी श्री संजय जगताप पोलीस निरीक्षक स्थानी गुन्हे शाखा यांना दिली व पोलीस निरीक्षक जगताप सोबत टीम असे बातमीचे ठिकाण रवाना झाले.

त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक जगताप यांनी प्राप्त गोपनीय बातमीप्रमाणे कामठी कडून बेगमपूरच्या दिशेने एक किसम आपल्या ताब्यात एक मारुती सुझुकी कंपनीची शिफ्ट कार नंबर एम एच दहा डी क्यू ८८ ९७ घेऊन येत असल्याने सदर ठिकाणी सापळा लावून थांबलेल्या ठिकाणी सदरचा एसएमएस पोलीस निरीक्षक जगताप यांनी सापळा पथकातील पोलिस अंमलदार यांना इशारा करून संपर्क राहण्याच्या सूचना दिल्या सदर इस जवळ येतात पोलीस निरीक्षक जगताप यांनी यांना बातमीतील हेच इसम असल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी केलेला इशारावरून सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्यांनी त्या इसमास जागीच पकडले व त्यानंतर सदर इसमास आपले त्याचं नाव पत्ता विचारताच त्यांनी नाव शुभम लालासाहेब काळे वय २८ वर्ष हरगुळ रेल्वे जवळ बार्शी रोड सध्या राहणार एमआयडीसी लातूर आरळी रोड आंबेडकर नगर अली रोड, जत जिल्हा सांगली असे असल्याचे सांगितले तिच्या शिफ्ट कार सोबत असलेले पोत्याबाबतचे माहिती विचारली असता कुरवाडवीची उत्तरे देऊ लागला. सदर पोथी तपासल्या असला त्यामध्ये उग्र वास असलेला ओलसर हिरव्या रंगाचा पाणी बिया बोंड आलेला मादक पदार्थ असलेला एकूण ८,९९,७०० रुपये किमतीचा १७ किलो ९९४ ग्राम वजनाचा गांजा सह शिफ्ट कार मोबाईल असे एकूण १५ लाख ७९, ७००/किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून जप्त करण्यात आला सदर इसम विरुद्ध यांच्याविरुद्ध कामठी पोलीस ठाणे गोरा नंबर ३०२/२०२६ गुंगीकारक औषध द्रव्य आणि मनू व्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम८(क)२०ब!!(ब) अन्वय कामठी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद आरोपीस गु.रा.न.३०२/२०२६ अटक करण्यात आली असून म्हणे पतंगर्ग न्यायालय त्यास दिनांक १६/१०/२०२६ पोलीस कोठडी सुनावली आहे सदर आरोपींनी म** कुठून आणला व कुठे नेणार यासाठी पोलीस कोठडी देण्यात आले आहे. दरम्यान तपास सुरू केला आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक विजय शिंदे स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण हे करत आहे.

सदरची कामगिरी मा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मा अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, मा अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती पेरणा कट्टे, यांचे मार्गदर्शन खाली पोलीस निरीक्षक संजय जगताप स्थापू शाखा यांचे नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शिंदे पोलीस हवलदार दशरथ गोरे अविनाश पाटील रवी माने अतुल घाडगे पोलीस कॉन्स्टेबल अनवर आधार मनोज राठोड.

प्रमोद गायकवाड राहुल दरेकर तसेच कामठी पोलीस ठाणे कडील वसई आसमान शेख पोलीस हेड कायदे यांनी केली आहे.

# ए. एन. टी. एफ अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स छत्रपती संभाजी नगर कृती दलाचे अधिकारी व अंमलदाराचे विशेष पोलीस महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य यांच्याकडून गौरव व सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : दिनांक १६/ १० २०२६ रोजी पुणे अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कार्यालय येथे छत्रपती संभाजी नगर अमली पदार्थविरोधी टास्क फोर्स कृती दलाचे डी. वाय. एस. पी. श्री. साईनाथ ठोंबरे पोलीस निरीक्षक गीता बागवडे पोलीस उपनिरीक्षक प्रदीप ठाकूर सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वाहेद मुल्ला, हनुमान पुरके हेडकॉन्स्टेबल रविंद्र साळवे साळवे, कैलास गाडेकर,नितीन जाधव,शैला टेळे, सुरेश राऊत, नागेश केंद्रे, निलेश सरपाळे, राहुल काळे, अतुल तुपे,हरीशचंद्र मुंढे, सूरज जोनवाल, ज्ञानेश्वर चव्हाण, आम्रपाली सूर्यवंशी, ज्योती कीर्तीकर, ज्ञानेश्वर शेलार प्रियंका पवार यांना एन.डी. पी.एस कायदा अन्वये गांजा, अफू, एमडी ड्रग्स वर केलेल्या कारवाया व युवा पिढीमध्ये नशा विरोधी राबविलेले जनजागृती यासाठी गौरव व सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आला. सदर टीमला पोलीस अधीक्षक श्री अजित टिके साहेब यांचे मार्गदर्शन लाभले.



सदर कार्यक्रमास ए एन टी एफ चे विशेष पोलीस महानिरीक्षक श्रीमती ज्योतिप्रिया सिंह, पोलीस उप महानिरीक्षक श्री.प्रवीण पाटील, पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे, पोलीस उपअधीक्षक हिम्मत जाधव हे हजर होते.

# जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत ‘एमआयटी ज्युनिअर कॉलेजची उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सांगोला बास्केटबॉल असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित १९ वर्षांखालील शालेय जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत वाखरी (पंढरपूर) येथील माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल ज्युनिअर कॉलेजच्या मुलांच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावून उपविजेतेपदावर नाव कोरले. सांगोला विद्यामंदिर येथे पार पडलेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच कमालीचे सांघिक कौशल्य, वेगवान चाली आणि उत्कृष्ट समन्वयाचे दर्शन घडवत प्रतिस्पर्धी संघांना पराभूत करून अंतिम फेरीत धडक मारली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यांमध्ये खेळाडूंनी जिद्दीच्या जोरावर मोलाचा लढा देत हे घवघवीत यश मिळवले. या उपविजेत्या संघामध्ये कर्णधार तन्मय उद्धव होले आणि उपकर्णधार प्रशांत हणमंत खरात यांच्यासह कार्तिक कदम, धीरज कदम, उदय खरात, प्रणव जठार, ओम खटकाळे, अबूबकर नदाफ, मोहित कांबळे, तनिष्क देशमाने, राजवीर बोरसुरे आणि प्रतीक गायकवाड या खेळाडूंचा समावेश होता. या सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रविण पिसाळ यांचे मोलाचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाच्या हेडमिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी आणि प्राचार्य डॉ. स्वप्निल शेठ यांनी सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले आणि राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

**ज्ञानयात्री डॉ. रोंगे सर १०० टक्के विजयी होणार**

# सांगली जिल्ह्यात ज्ञानयात्री डॉ.बी.पी. रोंगे सरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मिरज – राज्यातील शिक्षक मतदार संघाची निवडणूक आठवड्यावर येऊन ठेपली असून पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षणातील विविध यशस्वी उपक्रमांमुळे राज्यात ‘ज्ञानयात्री’ म्हणून राज्यात ओळख झालेले स्वेरीचे डॉ. बी. पी. रोंगे सर हे सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधत आहेत आणि त्याला प्रचंड प्रतिसाद देखील लाभत आहे. साधारण वर्षभरापासून डॉ. बी.पी.रोंगे सर हे पुणे विभागात असणाऱ्या पाचही जिल्ह्यांतील शाळा महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देवून समस्या जाणून घेत आहेत. ज्याप्रमाणे स्वेरीतील विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल होत आहे त्याचप्रमाणे ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचे भविष्यही उज्वल झाले पाहिजे. डॉ. रोंगे सरांच्या रूपाने पुणे विभागाला अभ्यासू आमदार मिळणार असल्याची भावना निर्माण झाली असून डॉ.रोंगे सरांच्या रूपाने शिक्षकांना मात्र खमक्या आणि नियोजनद्ध समस्या सादर करणारे नेतृत्व मिळणार आहे हे मात्र नक्की !



गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. डॉ.रोंगे सर हे गेल्या वर्षापासून पुणे विभाग मतदार संघातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे व सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील शाळा व कॉलेज मधील पदाधिकारी व शिक्षकांना भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. सर्वत्र डॉ. रोंगे सरांचे भव्य स्वागत केले जात आहे. या अनुषंगाने प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने प्रचारात मात्र कमालीची आघाडी घेतली असल्याचे स्पष्ट होत आहे. स्वेरीच्या स्थापनेपासून डॉ. रोंगे सरांची मुद्देसूद आणि व्यवस्थित मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या तंत्रशुद्ध अभ्यासाचा आता राज्याला फायदा होणार आहे, हे मात्र वाढत्या प्रतिसादावरून समजते. एकूणच डॉ. रोंगे सरांकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे तसेच त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षभरापासून सुरू झालेल्या या काळात प्राचार्य डॉ. रोंगे सरांचे पाचही जिल्ह्यांत झंझावाती दौरे सुरु असून त्यांना सर्वत्र उस्फुर्तपणे प्रतिसाद लाभत आहे. मतदार नोंदणी पासून निवडणूकीच्या सर्व प्रक्रिया याबाबत डॉ. रोंगे सर प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी डॉ. रोंगे सरांना पाठिंबा दर्शविला आहे. या भेटीमध्ये सर्व शाळांमध्ये प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी डॉ. रोंगे सरांचे कमालीचे स्वागत करत आहेत. मागील उमेदवारांनी फारसे काहीही केले नसल्याची भूमिका घेत आता डॉ. रोंगे सरांमुळे उत्साह वाढल्याचे दिसत आहे. एकूणच डॉ.रोंगे सर यांच्या स्वेरी, एसव्हीआयटी आणि स्वाईप या तिन्ही संस्थांना अल्पावधित मिळालेल्या यशामुळे शिक्षकांची अपेक्षा वाढली आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात सांगली जिल्ह्याच्या मिरज तालुक्यातील आर. एम. हायस्कूल मिरज, आयडियल इंग्लिश स्कूल मिरज, मिरज महाविद्यालय मिरज, कन्या महाविद्यालय मिरज, विद्या प्रशाला मिरज, बळवंतराव मराठे विद्यालय मिरज, संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट, विद्यादीप इंग्लिश स्कूल, न्यू इंग्लिश स्कूल कसबे डिग्रज, जुबली इंग्लिश स्कूल मिरज असे मिळून जवळपास २२ शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन डॉ. रोंगे सरांनी आपली भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य करणाऱ्या डॉ. रोंगे सरांना आपल्या अभ्यासाने आणि नियोजनात्मक धोरणामुळे यश मिळत आहे. या निवडणुकीच्या कारणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या भेटींचे सर्वत्र स्वागत होत आहे. या भेटी दरम्यान बोलताना ज्ञानयात्री डॉ.बी.पी. रोंगे सर म्हणाले की ‘आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी, समस्या आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. खरे पाहता हे प्रश्न फार पूर्वी सुटायला हवे होते. परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. यासाठी जर आपण सेवा करण्याची संधी दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.’ अशी ग्वाही त्यांनी दिली. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी कांही प्रश्न सोडविले आहेत त्यामुळे डॉ. रोंगे सरांकडे पुणे विभागातील शिक्षक आशेने पाहत आहेत, हे मात्र नक्की जाणवते.

# ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्याच्या मागणीला शासनस्तरावर गती

## ग्रामीण भागातील शेती, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाची आग्रही भूमिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे । प्रतिनिधी : विजय घनघाव / प्रफुल्ल शेवाळे, ठाणे जिल्हा ग्रामीण

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकरी आणि ग्रामीण जनतेला दिलासा द्यावा, या मागणीने आता शासनस्तरावर वेग घेतला आहे. ठाणे जिल्हा ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शिष्टमंडळाने ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांची भेट घेऊन जिल्ह्यातील ग्रामीण भागातील परिस्थिती आणि दुष्काळग्रस्त घोषणेची आवश्यकता याकडे लक्ष वेधले. या मागणीची दखल घेत शरद पवार यांनी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर महसूलमंत्र्यांनी ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून या प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली.

या घडामोडींमुळे ठाणे जिल्ह्यातील दुष्काळाच्या प्रश्नाला राज्यस्तरावर महत्त्व प्राप्त झाले असून, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या परिस्थितीचा प्रशासकीय पातळीवर आढावा घेण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे. दरम्यान, या विषयावर चर्चा करण्यासाठी १९ ऑक्टोबर रोजी शिष्टमंडळाच्या भेटीचे आयोजन करण्यात आले आहे. या भेटीत कोणती भूमिका मांडली जाते आणि त्यानंतर प्रशासनाकडून कोणती ठोस पावले उचलली जातात, याकडे जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेऊन निर्णय घेण्याची मागणी**

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात शेतीशी संबंधित प्रश्न, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी लक्षात घेता जिल्ह्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्याच्या मागणीवर गांभीर्याने विचार व्हावा, अशी भूमिका शिष्टमंडळाने मांडली.

दुष्काळी परिस्थितीचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतमजुरांचे रोजगार, पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही होऊ शकतो. त्यामुळे परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी शिष्टमंडळाकडून करण्यात आली.

### शरद पवारांच्या पुढाकारानंतर महसूलमंत्री बावनकुळेंचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश!

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याची परिस्थिती, पर्जन्यमान, पीकस्थिती, पाणीसाठे आणि शेतीवरील परिणाम यांचा स्वतंत्रपणे आढावा घेऊन शासनाने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही या मागणीमागे व्यक्त करण्यात आली आहे.

**शरद पवारांच्या हस्तक्षेपानंतर महसूलमंत्र्यांकडून प्रशासकीय हालचाली**

ठाणे जिल्हा ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने उपस्थित केलेल्या प्रश्नांची दखल घेत शरदचंद्र पवार यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी संपर्क साधला. ठाणे जिल्ह्यातील परिस्थितीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांनी लक्ष वेधल्याचे शिष्टमंडळाकडून सांगण्यात आले.

त्यानंतर महसूलमंत्री बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून या प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याची माहिती आहे.

या संपर्कामुळे दुष्काळग्रस्त घोषणेच्या मागणीला प्रशासकीय स्तरावर पुढील दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. तथापि, जिल्ह्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्याबाबतचा अंतिम निर्णय हा शासनाच्या लागू निकषांनुसार, उपलब्ध आकडेवारीच्या आधारे आणि संबंधित प्रशासकीय प्रक्रियेनंतरच घेतला जाईल.

**शिष्टमंडळात ज्येष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांचा सहभाग**

या मागणीसाठी शरदचंद्र पवार यांची भेट घेणाऱ्या शिष्टमंडळात ज्येष्ठ नेत्या विद्याताई वेखंडे, प्रदेश उपाध्यक्ष काशिनाथ पाटील, प्रदेश सरचिटणीस अविनाश देशमुख, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भरत (भाऊ) गोंधळे, बदलापूर शहराध्यक्ष रमेश चव्हाण, अंबरनाथ ग्रामीण अध्यक्ष यशवंत पाटील, अविनाश थोरात, रविंद्र परटोले, ज्योती वाघमारे आणि सागर राठोड यांच्यासह अन्य पदाधिकारी व सदस्य सहभागी झाले होते.



शिष्टमंडळाने जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रश्न मांडताना शेतकऱ्यांना आर्थिक व प्रशासकीय स्तरावर दिलासा मिळण्याची आवश्यकता अधोरेखित केली. परिस्थितीचा सर्वंकष आढावा घेऊन शासनाने योग्य निर्णय घ्यावा आणि आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांना निर्देश द्यावेत, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

**दुष्काळग्रस्त घोषणेच्या मागणीसंदर्भात १९ ऑक्टोबर रोजी होणारी भेट महत्त्वपूर्ण**

मानली जात आहे. या वेळी जिल्ह्यातील परिस्थिती, दुष्काळ जाहीर करण्यासाठी आवश्यक निकष, संभाव्य उपाययोजना आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. या प्रक्रियेत पर्जन्यमान, पीकपेरणी व पीकस्थिती, उपलब्ध जलसाठे आणि शासनाने निर्धारित केलेले दुष्काळ मूल्यांकनाचे निकष यांचा विचार महत्त्वाचा ठरणार आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाचा अहवाल आणि शासनाची भूमिका निर्णायक ठरू शकते.

**शेतकऱ्यांना दिलासा मिळणार का? प्रशासनाच्या निर्णयाकडे लक्ष**

ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्याची मागणी, शरद पवार यांनी घेतलेला पुढाकार आणि महसूलमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी साधलेला संपर्क या घटनांमुळे या प्रश्नाला नवी गती मिळाली आहे.

मात्र, राजकीय स्तरावर मांडण्यात आलेली मागणी आणि शासनाचा अधिकृत निर्णय यामध्ये प्रशासकीय मूल्यांकनाची प्रक्रिया महत्त्वाची असणार आहे. त्यामुळे १९ ऑक्टोबरच्या भेटीनंतर कोणती कार्यवाही निश्चित होते, जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा कसा घेतला जातो आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कोणते निर्णय घेतले जातात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

आता ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागाला दिलासा देण्यासाठी शासन आणि जिल्हा प्रशासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# वर्षावास समारोप कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहवे : भदन्त धम्मसार थेरो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी(एस. के.गायकवाड) : औसा तालुक्यातील किल्लारी व परिसरातील लातुर आणि धाराशिव जिल्ह्यातील सर्व श्रध्दा संपन्न बौध्द उपासक आणि उपासिका (बौध्द बांधव) यांनी दि.२५ ऑक्टोबर २०२६ वार रविवार रोजी सकाळी ठिक १०.०० वा.दरम्यान किल्लारी येथे आयोजित १२ व्या वर्षावास समारोप कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवहान भदन्त धम्मसार थेरो यानी केले आहे.

भदंत धम्मसार थेरो गेल्या १२ वर्षा पासून दरवर्षी आषाढी पोर्णिमा ते आश्विनी पोर्णिमा म्हणजे वर्षा वासाच्या काळात तिन महिने धम्म प्रचार आणि प्रसाराचे काम करतात.या वर्षी त्यांनी तिन महिन्यांच्या वर्षावास काळात येणाऱ्या प्रतयेक रविवारी लातूर व धाराशिव जिल्ह्यातील काही गावांमध्ये एक दिवसिय अनापान ध्यान व धम्म संस्कार शिबिर घेवून आपला १२ वा वर्षास संपन्न केला असून या १२ व्या वर्षावास समारोपाच्य निमित्ताने.तक्षशिला बुद्ध विहार किल्लारी ता.औसा जिल्हा लातूर येथे तथागत भगवान बुद्ध आणि परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र विचारांच्या प्रेरणेने,यावर्षीच्या 'वर्षावास समारोप' व (कठीण चिवर दान) सोहळ्याचे अत्यंत मंगलमय आणि उत्साही वातावरणात आयोजन करण्यात आले आहे.



वर्षावास हा काळ धम्म श्रवण,सदाचार आणि आत्मपरीक्षणाचा असतो.या पवित्र काळाची यशस्वी सांगता करण्यासाठी विहाराच्या वतीने विशेष बुद्ध वंदना, धम्म देसना आणि सामूहिक सुत्त पठण अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.या निमित्ताने पूज्य भदंत धम्म नाग महाथेरो हत्याळ, पूज्य भदंत सुमेध जी नागसेन खरोसा,पूज्य भदंत धम्मबोधि करडखेल,पूज्य भदंत सुमंगल कराळी, पूज्य भदंत संघानंद, सोलापूर,आदींची धम्म देशना होणार असून यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी मंत्री तथा विद्यमान विधान परिषद आमदार बसवराज पाटील, माजी मंत्री नामदार संजय बनसोडे विद्यमान आमदार उदगीर विधानसभा,विनोद खटके संस्थापक अध्यक्ष व्ही एस पँथर महाराष्ट्र राज्य,कैलास शिंदे माजी समाज कल्याण सभापती धाराशिव जिल्हा परिषद,दिलीप भालेराव माजी जिल्हा परिषद सदस्य,

आयुष्य मती गंगाबाई कोदळीकर(थोरात) पंचायत समिती सभापती औसा, आदींची उपस्थिती राहणार आहेत.

तरी दि.२५ऑक्टोबर २०२६ वार रविवार रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत तक्षशिला बुद्ध विहार,तथागत बुद्ध गार्डन ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागे किल्लारी तालुका औसा जिल्हा लातूर येथे समस्त बौद्ध उपासक उपासिका यानी मोठ्या संस्थेने उपस्थिती राहवे असे आवहान भदंत धम्मसार थेरो, स्वागत अध्यक्ष उप सरपंच युवराज गायकवाड सह बुध्द विहार समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

# सैनिक टाकळी येथे दुर्गामाता दौडीचा भक्तिमय जल्लोष!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी । प्रतिनिधी : संजय चव्हाण

सैनिक टाकळी : भक्तीचा जागर, दुर्गामातेचा जयघोष, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची प्रेरणा आणि पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांचा उत्साह अशा मंगलमय वातावरणात सैनिक टाकळी येथे दुर्गामाता दौड व नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. शिवाजी तरुण मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या दुर्गामाता दौडीमुळे परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, मंडळाच्या या उपक्रमाचे नागरिक आणि भाविकांकडून कौतुक केले जात आहे.

नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो श्रद्धा, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा उत्सव आहे. याच भावनेतून शिवाजी तरुण मित्र मंडळाच्या वतीने दुर्गामाता दौड आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमातून तरुणाईमध्ये धार्मिक संस्कार रुजविण्यासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, स्वराज्याची प्रेरणा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. रविवारी पहाटे संभाजीनगर येथून दुर्गामातेची आरती करून दौडीला सुरुवात करण्यात आली. सकाळच्या प्रसन्न वातावरणात दुर्गामातेच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. या दौडीत भाविक, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ठिकठिकाणी भाविकांनी दुर्गामातेचे स्वागत करून दर्शन घेतले. श्रद्धा आणि उत्साहाने सहभागी झालेल्या भाविकांमुळे दौडीला विशेष रंगत आली. दुर्गामाता दौड ही केवळ धार्मिक परंपरा न राहता समाजात एकजूट, शिस्त, संस्कार आणि सकारात्मक विचार रुजविणारे माध्यम ठरत आहे. तरुणांनी एकत्र येऊन धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवावा, आपल्या परंपरांचे जतन करावे आणि इतिहासातील प्रेरणादायी विचार आत्मसात करावेत, हा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे.

दौडीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील शौर्य, पराक्रम आणि स्वराज्याच्या कार्याची आठवण करून देणारी शिवजागृती गीते सादर करण्यात आली. या गीतांमुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शिवरायांचे शौर्य, त्यांची दूरदृष्टी, स्वराज्यनिष्ठा आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यांची आठवण करून देणाऱ्या गीतांनी तरुणाईमध्ये इतिहासाविषयी अभिमान जागविण्याचे काम केले. धार्मिक श्रद्धेसोबतच ऐतिहासिक वारशाची जपणूक करणारा हा उपक्रम सैनिक टाकळीच्या सांस्कृतिक जीवनात महत्त्वपूर्ण ठरत आहे. शिवरायांचे विचार केवळ ऐकण्यापुरते मर्यादित न राहता त्यातून प्रेरणा घेऊन समाजहिताचे कार्य करण्याची भावना अशा उपक्रमांमधून दृढ होत आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने राजमाता जिजाऊ लेझीम मंडळाच्या वतीने विविध पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. लेझीमच्या तालावर सादर होणारी प्रात्यक्षिके, पारंपरिक खेळ आणि सांस्कृतिक सादरीकरणांमुळे उत्सवात चैतन्य निर्माण होत आहे. महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचा महत्त्वाचा भाग असलेल्या लेझीममुळे शिस्त, संघभावना आणि शारीरिक चपळतेचे दर्शन घडते. पारंपरिक कलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे, या दृष्टीने अशा उपक्रमांना विशेष महत्त्व आहे.

नवरात्रोत्सवादरम्यान लाठीकाठी आणि पारंपरिक खेळांचे आयोजनही करण्यात येते. या खेळांमधून महाराष्ट्राच्या पारंपरिक युद्धकलेची आणि शारीरिक कौशल्यांची ओळख होते. पारंपरिक खेळांचे जतन व्हावे, तरुणांमध्ये शिस्त आणि आत्मविश्वास वाढावा तसेच आपल्या सांस्कृतिक वारशाविषयी अभिमान निर्माण व्हावा, या दृष्टीने या उपक्रमांकडे पाहिले जात आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबतच अशा पारंपरिक कलांना स्थान दिल्यामुळे नवरात्रोत्सव अधिक वैविध्यपूर्ण बनत आहे.

नवरात्रोत्सवाचे प्रमुख आकर्षण असलेल्या दांडिया कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येत आहे. दांडिया ग्रुपच्या माध्यमातून नऊ दिवस विविध कार्यक्रम साजरे केले जात आहेत. पारंपरिक वेशभूषा, संगीताचा ताल आणि दांडियाच्या उत्साहामुळे उत्सवाला सांस्कृतिक रंगत प्राप्त होत आहे.

महिला, युवक आणि नागरिकांना एकत्र आणणारे हे कार्यक्रम सामाजिक सलोखा वाढविण्यास मदत करतात. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने सर्वांनी एकत्र येऊन आनंद साजरा करावा आणि आपापसातील स्नेहबंध अधिक दृढ करावेत, अशी भावना या कार्यक्रमांतून व्यक्त होत आहे.

नवरात्रोत्सव केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता नागरिकांच्या मनोरंजनासाठीही विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये महिलांसाठी 'होम मिनिस्टर'सारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. याशिवाय विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमुळे नऊ दिवसांच्या उत्सवात उत्साह टिकून राहतो. महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि समाजातील सर्व घटकांना उत्सवात सहभागी करून घेणे, या दृष्टीने अशा कार्यक्रमांना महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवाजी तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे सर्व सदस्य दुर्गामाता दौड आणि नवरात्रोत्सवाच्या विविध कार्यक्रमांसाठी परिश्रम घेत आहेत. धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, सांस्कृतिक उपक्रमांचे नियोजन आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी मंडळाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

संभाजीनगरमधील नागरिक, भाविक आणि युवकांनी दुर्गामाता दौडीमध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सैनिक टाकळी येथील दुर्गामाता दौड आणि नवरात्रोत्सवातून धार्मिक श्रद्धा, महाराष्ट्राची परंपरा, शिवरायांचे विचार आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम पाहायला मिळत आहे. अशा उपक्रमांमुळे गावातील नागरिकांना एकत्र येण्याची संधी मिळते, युवकांना विधायक कार्याची प्रेरणा मिळते आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याची भावना अधिक दृढ होते.

दुर्गामातेच्या भक्तीचा जागर करताना शिवरायांच्या विचारांची प्रेरणा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपणारा सैनिक टाकळीचा नवरात्रोत्सव नागरिकांसाठी उत्साह, श्रद्धा आणि एकात्मतेची पर्वणी ठरत आहे. शिवाजी तरुण मित्र मंडळाच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

**नवरात्र महोत्सव आठवी माळ**

# श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक पसरती बैठक पोशाख अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



प्रतिनिधी/पंढरपूर : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात झाली आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे आठव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस पसरती बैठक पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचे मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठया जोड, शिरपंच मोठा, शिरपेत लहान, मोत्याचा तुरा, तुळशीची माळ एक पदरी, लॉकेट पाच पदरी, लहान चंद्रहार, लॉकेट नऊ पदरी, लॉकेट पट्टीचे, अष्टपैलू मण्याची कंठी, मोहनमाळ, अष्टपैलू कंठी पदकासह, लॉकेट बदामासह, तोडे जोड, लॉकेट चार पदरी, मत्स्य जोड, सोने पितांबर इ. अलंकार परिधान करण्यात आलेली आहेत.

तसेच रुक्मिणी मातेस सोन्याचे मुकुट, खड्यांची वेणी, सोन्या मोत्याची ताणवाड, चिंचपेटी हिरवी, मोत्याचा कंठा, मन्या मोत्याच्या पाटल्या जोड, मोत्यांचे मंगळसूत्र, मोत्याचे बाजूबंद, पैंजण जोड, कर्णफुले, मोरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, कंबरपट्टा, जवमणी पदक, तारामंडळ, हिऱ्यांची नथ इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस नक्षी टोप, चिंचपेटी तांबडी, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, लक्ष्मी हार

सत्यभामा देवीला नक्षी टोप, पुतळ्यांची माळ, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, तुळशी माळ इत्यादी अलंकार

महालक्ष्मी मातेला सोन्याचे गंठण, इमिटेशन नेकलेस, लफ्फा, शिरपेच मोठी, बोरमाळ, मोहरांची माळ, जवेची माळ,. तांदळा हार, मोठी एकदानी, चांदीची छत्री इत्याधी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री. व्यंकटेशास राम अवतार पोशाखासह मोहनमाळ, नामनिळाचा, राखी, कोयरीहार, हिऱ्याचे कंगन, मोत्याची कंठी, मोत्याची कंठी दोन पदरी, दंडपेट्या जोड, नक्षी टोप, प्रभावळीसह, मारवाडी पेठयांच्या मोतीहार, तुळशीमाळ, बाजीराव कंठी, बासरी, चांदीची छत्री इत्यादी अलंकार प्रथा परंपरेप्रमाणे परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आलेले आहेत.

तसेच दि. २० ऑक्टोंबर रोजी रिध्दी - सिध्दी गणपती मंदिरात विजया दशमी दसरा निम्मित दरवर्षी प्रमाणे सिमोल्लंघन साजरे करण्यात येत आहे, तसेच त्या ठिकाणी देखील आवश्यक त्या सोई सुविधा पुरविण्यात येत आहेत.

दि.२२ ऑक्टोंबर रोजी एकादशी असल्याने भाविकांची मोठी प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने दर्शनरांगेत सुरक्षा रक्षक नियुक्ती, पाणी व चहा वाटप, बॅरीकेटींगची व्यवस्था विद्युत व्यवस्था इतर अनुषंगीक सोई सुविधा पुरेसा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.